# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

## (उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.
2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. भारत सरकार, गृह मंत्रालय यांचे आदेश क्र. 40-3/2020-DM-I(A) दि. 29 ऑगस्ट 2020.
5. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 31 ऑगस्ट 2020.
6. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी-3/सीआर-26 दि. 04.05.2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26
दिनांक:- 21 / 09/2020.

**सुधारित आदेश :-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 6 अन्वये करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता सार्वजनिक स्थळी थुंकण्यावर बंदी, चेह-यावर कायम मास्क/स्वच्छ रुमाल वापरणे, सोशल डिस्टन्सिंग पाळणे गरजेचे असल्याने या बाबींचे पालन व्हावे याकरिता असे गैरकृत्य करणा-या व्यक्तीविरुद्ध दंडात्मक व फौजदारी कार्यवाही करणेबाबत आदेश पारित करण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी कोविड-19 चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन प्रभावीपणे होण्याकरिता संदर्भ क्र. 6 चे आदेशात दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी कौस्तुभ दिवेगावकर, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद संदर्भ क्र. 2, 3 अन्वये व फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 मधील तरतुदींनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार उस्मानाबाद जिल्ह्यातील करोना विषाणु (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून लॉकडाऊनच्या वाढविलेल्या कालावधीत खालील नमूद स्वरुपाचे गैरकृत्य करणा-या व्यक्तीविरुद्ध दंडात्मक व फौजदारी कार्यवाही करणे बाबत संदर्भ क्र. 6 च्या आदेशात दुरुस्ती करुन खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

| अ. क्र. | गैरकृत्याचे स्वरुप | प्रथम आढळल्यास करावयाची दंडात्मक कार्यवाही | दुस-यांदा आढळल्यास करावयाची कायदेशीर कार्यवाही | कार्यवाही करणारा विभाग |
|---|---|---|---|---|
| 1 | सार्वजनिक स्थळी (रस्ते, बाजार, रुग्णालय, कार्यालय इ.) थुंकणे | रक्कम रु. 500/- दंड | फौजदारी कारवाई करणे | 1. स्थानिक स्वराज्य संस्था (न.पा./न.पं./ग्रा.पं.)<br>2. संबंधीत शासकीय कार्यालयप्रमुख (कार्यालय क्षेत्रामध्ये)<br>3. पोलिस विभाग |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | सार्वजनिक स्थळी चेह-यावर मास्क/स्वच्छ रुमाल न वापरणे /नाक व तोंड सुरक्षितपणे पूर्ण झाकलेले नसणे | रक्कम रु. 1000/- दंड | फौजदारी कारवाई करणे | 1. स्थानिक स्वराज्य संस्था (न.पा./न.पं./ग्रा.पं.)<br>2. संबंधीत शासकीय कार्यालयप्रमुख (कार्यालय क्षेत्रामध्ये)<br>3. पोलिस विभाग |
| 3 | 1. दुकानदार/फळभाजीपाला विक्रेते / सर्व जिवनावश्यक वस्तु विक्रेते इत्यादी व ग्राहक यांनी सोशल डिस्टन्सिंग न राखणे.<br>2. ग्राहकांमध्ये कमीत कमी 6 फूट (2 गज की दूरी) अंतर न राखणे.<br>3. विक्रेत्यांने दुकानासमोर मार्कीग न करणे. | 1. ग्राहक/व्यक्तीं यांचेसाठी रक्कम रु. 200/- दंड<br>2. आस्थापना मालक/दुकानदार/विक्रेता यांचेसाठी रक्कम रु. 500/- दंड | फौजदारी कारवाई करणे | 1. स्थानिक स्वराज्य संस्था (न.पा./न.पं./ग्रा.पं.)<br>2. पोलिस विभाग<br>3. संबंधित तालुक्याचे तालुका कार्यकारी दंडाधिकारी |
| 4 | किराणा / जिवनावश्यक वस्तु विक्रेत्याने वस्तुंचे दरपत्रक न लावणे | रक्कम रु. 1000/- दंड | फौजदारी कारवाई करणे | 1. स्थानिक स्वराज्य संस्था (न.पा./न.पं./ग्रा.पं.)<br>2. पोलिस विभाग<br>3. संबंधित तालुक्याचे तालुका कार्यकारी दंडाधिकारी |
| 5 | दुचाकीवर दोनपेक्षा अधिक व्यक्ती बसलेली असणे तसेच हेल्मेट व मास्क परिधान केलेला नसणे | रक्कम रु. 500/- दंड | फौजदारी कारवाई करणे | 1. स्थानिक स्वराज्य संस्था (न.पा./न.पं./ग्रा.पं.)<br>2. पोलिस विभाग<br>3. संबंधित तालुक्याचे तालुका कार्यकारी दंडाधिकारी |

सदरील आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता 1860 चे कलम 188 अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे, असे मानन्यात येईल. तसेच संबंधीत व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 च्या कलम 51 ते 60, महाराष्ट्र कोविड उपाययोजना नियम 2020 चे नियम 11, भारतीय साथरोग अधिनियम 1897 अंतर्गत कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

वरिल गैरकृत्य करणा-या व्यक्तींवर कार्यवाही करण्यासाठी नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांनी आवश्यकतेनुसार फोटोग्राफी/व्हिडीओग्राफी (मोबाईल इत्यादीद्वारे) करावी. याकरिता स्थानिक स्वराज्य संस्था यांनी पोलीस विभागाची मदत घ्यावी.

सदरचा आदेश आज दि. 21 /09/2020 रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिला आहे.

(कौस्तुभ दिवेगावकर)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.



Scanned by CamScanner

प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद.
5. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद.
6. जिल्हा क्रीडा अधिकारी, उस्मानाबाद.
7. विभाग नियंत्रक, रा. प. उस्मानाबाद.
8. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
9. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
10. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
11. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं. जि. प. उस्मानाबाद.
12. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन,. उस्मानाबाद.
13. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
14. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
15. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
16. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**



Scanned by CamScanner